# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ४११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१४/०७/२०१६.

**१) फावडयाने मारुन जखमी केले व धमकी दिली . :–**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी १७.०० वा. दर. फिर्यादी सौ. मंदाबाई दसाराम राहाटे, वय ४७ वर्ष, रा. कोका जंगल ही तिच्या घरा समोरील ग्रा.पं.च्या नालीत पावसाचे पाणी जाण्या करीता नाली साफ करीत असतांना आरोपीने फिर्यादीला ''तु नाली साफ करु नको माझ्या घराची भिंत खचेल'' असे म्हणुन शिविगाळ केली. व फिर्यादीच्या हातातील फावडा घेवुन तिच्या उजव्या डोळयाजवळ, उजव्या हाताच्या खांदयावर, उजव्या अंगठया जवळ मारुन जखमी केले. व फिर्यादीचा मुलगा गौरव याच्या उजव्या हाताच्या मनगटावर मारुन जखमी केले. व पुन्हा घरी येवुन मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादिचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) कृषी उत्पन्न अधिकारी असल्याचे सांगुन ट्रक अडवुन अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी १७.३० वा. दर. फिर्यादी विवास पुनम गोंड, वय ३७ वर्ष, रा. पेटापल्ली जि. करीमनगर तेलगंणा हा त्याचा ट्रक क्र. एपी १५ टीए ७२७२ मध्ये साईबाबा राईस मिल मोरगाव येथुन धान भरुन लाखणी कडे येत असतांना आरोपीने मोटार सायकलने ट्रकचा पाठलाग केला व ट्रकच्या समोर येवुन गाडी उभी केली. व हात दाखवुन फिर्यादीचा ट्रक थांबवुन अडथळा केला. व फिर्यादीला गाडी खाली बोलावुन ''मी कृषी उत्पन्न बाजार समिती लाखनी येथील अधिकारी आहे'' अशी बतावणी करुन फिर्यादीला धमकावुन माला संबधी कागदपत्राची पाहणी केली. व फिर्यादीला ट्रक समोर उभे ठेवुन फिर्यादी व ट्रकची शुटीग केली. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,१७० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पो.स्टे. लाखनी हे करीत आहे.

**३) ट्रकची चोरी . :–**

दिनांक ११/०७/०१६ चे २३.३० ते दि. १२/०७/२०१६ चे ०६.०० वा. दर. फिर्यादी मंगेश तुलाराम राऊत वय ३४ वर्ष, रा. डोंगरला यांनी त्यांच्या घरा समोरील अंगणामध्ये ठेवलेला १ अशोक लेलॅन्ड कंपनीचा पिवळया रंगाचा १० चाकी टिप्पर क्र. एमएच ३६ एफ ३४८३ कि. २६,००,०००/रु. चा ट्रक कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुण चोरुन नेला. फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली  . :–

दिनांक १२/०७/०१६ रोजी २१.३० वा. दर. फिर्यादी तोसराम गोपीचंद शेन्डे वय ६१ वर्ष, रा समता नगर नवाज डेकोरेशन जवळ भंडारा यांच्या घरी मुलीच्या लग्ना निमित्त हळदीच्या कर्यक्रमात डिजे लावला होता. यावर आरोपीने डि.जे. बंद करा. यावरुन आरोपीने अश्लिल शब्दात शिविगाळ केली. व फिर्यादीच्या चारचाकी वाहनाचे काच फोडुन २०,०००/रु. नुकसान केले. व घरात येवुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,४२७,५०६भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.